www.maharashtratimes.com

मटा +TOI : पुण्यात नंबर

# महाराष्ट्र टाइम्स



पुणे। शनिवार, १७ नोव्हेंबर २०१८ । पाने २० (पुणे प्लससह) । शहर आवृत्ती । ₹ ४.००

लग्नाची चर्चा हा



# राधिका सकपाळला दुहेरी मुकुट

म. टा. प्रतिनिधी, पुणे




राधिका सकपाळ

पुण्याच्या राधिका सकपाळने राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेतील १२ वर्षांखालील मुलींत दुहेरी मुकुट पटकावला. या स्पर्धेत राधिकाने प्रथमच हे यश मिळविले.

म्हाळुंगे-बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडानगरीत ही स्पर्धा झाली. १२ वर्षांखालील मुलींच्या एकेरीच्या अंतिम लढतीत तिसऱ्या मानांकित राधिका सकपाळने मुंबई उपनगरच्या अव्वल मानांकित सना डिसूझाला ४-० असे पराभूत केले आणि जेतेपदाला गवसणी घातली. मोसमातील दुसऱ्या आणि चौथ्या राज्य मानांकन स्पर्धेत राधिकाने सनाला हरवून जेतेपद मिळविले होते. तशाच कामगिरीची पुनरावृत्ती करण्यासाठी राधिका उत्सुक होती. पहिल्या गेममध्ये सनाने कडवी झुंज दिली. मात्र, मोक्याच्या क्षणी पॉइंट घेत राधिकाने पहिल्या गेममध्ये बाजी मारली. त्यापाठोपाठ दुसरी गेम ११-७ अशी, तर तिसरी गेम ११-५ अशी जिंकून राधिकाने ३-० अशी आघाडी घेतली. आव्हान राखण्यासाठी सनाला गेम जिंकणे गरजेचे होते. मात्र, चौथी गेम जिंकून राधिकाने जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. राज्य अजिंक्यपद स्पर्धेत एकेरीत राधिकाने दुसऱ्यांदा जेतेपद पटकावले. यापूर्वी, राधिकाने २०१६मध्ये दहा वर्षांखालील मुलींच्या गटात जेतेपद मिळविले होते.

स्पर्धेतील १२ वर्षांखालील मुलींच्या दुहेरीतही राधिकाने नागपूरच्या जेनिफर वर्गिसच्या साथीत विजेतेपद पटकावले. राधिका-जेनिफर यांनी सना डिसूझा-हार्दि पटेल या अव्वल मानांकित जोडीवर १४-१२, ८-११, ११-१३, ११-२, ११-२ अशी मात केली आणि जेतेपद पटकावले. तत्पूर्वी, उपांत्य फेरीत राधिका-जेनिफर यांनी केइशा झवेरी-अमिरा झवेरी यांच्यावर ११-४, ८-११, १०-१२, ११-७, १२-१० अशी, तर सना-हार्दि यांनी देवयानी कुलकर्णी-श्रावणी लोके यांच्यावर ७-११, ११-६, ११-८, ११-६ अशी मात केली होती. सिटी इंटरनॅशनल स्कूलमध्ये सहावीत शिकणारी राधिका ही नीरज होनप यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.

स्पर्धेतील १२ वर्षांखालील मुलांच्या एकेरीत मुंबई उपनगरच्या अक्षत जैनने विजेतेपद पटकावले. अंतिम लढतीत तिसऱ्या मानांकित अक्षतने ठाण्याच्या अव्वल मानांकित गौरव पंचांगमला ११-९, ७-११, ११-४, ८-११, ११-९, ५-११, ११-२ अशी मात केली. बारा वर्षांखालील मुलांच्या दुहेरीत गौरव पंचांगम-उदीत सचदेव यांनी विजेतेपद पटकावले. त्यांनी अंतिम लढतीत नील मुळ्ये-कुशल चोपडा यांच्यावर ५-११, ११-३, ७-११, ११-८, १३-११ अशी मात केली. तत्पूर्वी, उपांत्य फेरीत नील-कुशल यांनी वेदांग जोशी-आर्यन देशपांडे यांच्यावर ११-४, ११-९, ११-९ अशी, तर गौरव-उदीत यांनी अक्षत जैन-विनीत दीपक यांच्यावर ११-७, ११-७, ११-९ अशी मात केली होती.